# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 21/01/2024 (रविवार) सायंकाळ

---

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

दिनांक २१/०१/२०२४ चे दुपारी १२.०० वा. ते १२.३० वा. दरम्यान सचिन फेडरकर व त्याचा इतर दोन साथीदारांनी संगनमत करून प्लॉट विक्रीचा व्यवहारातील पैशाचा कारणावरून मालक मृतक विनोद अशोकराव बोंदरे वय अंदाजे ३६ वर्ष रा टेलीफोन नगर दिघोरी नागपूर यांचा नविन देसाई निवासी आश्रमशाळेच्या रोडच्या बाजुला असलेल्या कच्चा रोडवर धारधार हत्याराने व चाकुने शरिरावर अनेक ठिकाणी वार करून जिवानीशी ठार मारले आहे. सदर प्रकरणी आरोपीतांविरूद्ध पोस्टे कुही आरोपीतांविरूद्ध कलम ३०२, ३४ अन्वये गुन्हा नोद करण्यात आला आहे.

### रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

### विशेष पोलीस पथकाची कामगिरी

यातील आरोपीतांनी संगणमत करून, वाहन चालक आरोपी नामे आमीन यासीम खान आणि राजेषकुमार विश्वकर्मा आणि अतुल भगत यांनी, आरोपी मालक नामे महादेव उर्फ बबलु दयाराम पारधी आणि जुबेरखान लियाकतखान पठाण यांचे सांगणेप्रमाणे भंडारा येथुन नागपुर बुट्टीबोरी मार्ग वर्धा आणि यवतमाळ येथे वेगवेगळया ठिकाणी अवैधरित्या विनापरवाना स्वत:चे आर्थीक फायद्याकरीता रेती चोरी करून घेवुन जात असल्याने घटनास्थळावरून १) एक निळया व कथीया रंगाची, अशोक लेलॅन्ड कंपनीची १४ चक्का एलपी गाडी, ज्याचा वाहन क्र. एम.एच. ४०/ए.के. ४१९८, २) एक सिल्वर व लाल रंगाची, टाटा कंपनीची १६ चक्का एलपी गाड़ी, वाहन क एम.एच. ४० सि.टी. ४१९८, ३) एक पांढ–या व पॅद–या रंगाची, टाटा कंपनीची १६ चक्का एलपी गाडी, ज्याचा वाहन क एम. एच. ४० सि.टी. ५९३२ व ज्यामध्ये प्रत्येकी अंदाजे १४ ब्रास रेती असे एकुण ४२ बास रेती, वाहन चालक व क्लिनरचे मोबाईल असा एकुण १,३७,७७,०००/–रूपयाचा मुद्देमाल ताब्यात जप्त करण्यात आला. यातील आरोपी नामे– १) आमीन यासीम खान वय ५९ वर्ष, रा. वार्ड क्र. १८, संजय कॉलनी छपारा, (एम.एच. ४० ए. के. ४१९८ चा चालक), २) राजेषकुमार प्रेमचंद विश्वकर्मा, वय ३० वर्ष, रा. विजयपानी, पोस्ट–अडईपानी, पो. ठा. कानेवाडा, जिल्हा–पवनी, (एम.एच. ४० सि.टी. ४१९८ चा चालक), ३) अब्दुल रशीद सफाद खान वय १९ वर्ष, (एम. एच. ४० सि.टी. ४१९८ चा क्लिनर) ४) महादेव उर्फ बबलु दयाराम पारधी वय ३४ वर्ष, रा. देवलापार, तह–रामटेक, जिल्हा–नागपुर, (एम.एच. ४० ए.के. ४१९८ चा मालक) पाहीजे आरोपी, ५) अतुल अशोकराव भगत वय ३२ वर्ष (एम. एच. ४० सि.टी. ५९३२ चा चालक), ६) निकेष सुखदेव मेश्राम वय १९ वर्ष, (एम.एस. ४० सि.टी. ५९३२ चा क्लिनर), ७) जुबेरखान लियाकत खान पठाण वय ३७ वर्ष, (एम.एच. ४० सि.टी. ५९३२ चा मालक) यांचे विरूद्ध पोस्टे बोरी येथे कलम ३७९, १०९, ३४ भांदवि. महा. जमिन महसुल संहिता १८६० ४८(७), ४८(८), सहकलम ४, २१, ३ खाण व खनिज अधिनियम १९५७ अधिनियम अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण, अपर पोलीस अधिक्षक डॉ. संदिप पखाले यांचे मार्गदर्शनात विशेष पोलीस पथक सपोनि. अमित पांडे, पोहवा ललित उईके, पोलीस अंमलदार कार्तिक पुरी, शुभम मोरोकार, बालाजी बारगुले यांनी पार पाडली.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**